वाचले:-

1) मा.महापालिका ठराव क्रमांक 328 दिनांक 20/12/2018
2) मा.प्रधान सचिव -2 नगरविकास विभाग मुंबई यांचेकडे सादर केलेला प्रस्ताव क्रमांक शिक्षण/ आस्था/1अ/कावि/61/20019 दिनां क 30/03/2019
3) महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचे कडील शासन निर्णय क्रमांक पीसीसी-3018 प्र.क्र.525 / नवि-22 दिनांक 05/01/2022
4) सामान्य प्रशासन विभाग,महाराष्ट्र शासन यांचे कडील शासन निर्णय क्रमांक:एस आरव्ही 2016/ प्र.क्र.509/कार्या.12 दिनांक 15 मे 2019
5) नगर विकास विभाग,महाराष्ट्र शासन यांचे कडील शासन निर्णय क्र.संकीर्ण-2018/ प्र.क्र.389/नवि-20 दिनांक 16 फेब्रुवारी 2021
6) दिनांक 05/03/2022 रोजीचे बैठकीचे सभावृत्तांत
7) मा.आयुक्त सो. यांचेकडील मान्य प्रस्ताव दिनांक 17/03/2022

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
प्राथमिक शिक्षण विभाग
जा.क्र.शिक्षण/आस्था/1अ/कावि/123/2022
दिनांक 17/03/2022

**विषय :- शिक्षकांचे पती-पत्नी एकत्रीकरण /एकतर्फी बदली सेवा मनपामध्ये वर्गीकरणाबाबत धोरण ....**

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अंतर्गत प्राथमिक शिक्षणा विभाग कार्यरत आहे. शिक्षण मंडळ अस्थित्वात असताना वाचले क्रमांक 1 चे ठरावन्वये दिनांक 29/06/2017 नंतर प्राप्त झालेल्या अर्जाची छानन्नी करून शिक्षकांचे पती-पत्नी एकत्रीकरण/एकतर्फी बदली सेवा वर्गीकरणास व दिनांक 29/06/2017 चे पूर्वीचे प्राप्त झालेले अर्ज निरस्त करण्यास मान्यता दिलेली होती.सदर ठराव शासन निर्णयाचे विसंगत असल्याने वाचले क्रमांक1 चा ठराव वाचले क्रमांक 2 चे प्रस्तावान्वये विखंडीत करणेकामी शासनाकडे सादर केलेले होते.

मा. उच्च न्यायालय मुंबई येथे सेवा वर्गीकरण याबाबत एकूण 34 याचिकाकर्त्यांनी याचिका क्रमांक 2394/2019 व याचिका क्रमांक 17295/2019 दाखल केली . सदर याचिकेमध्ये ना.उच्च न्यायालयाने दिनांक 22 मार्च 2021 रोजी चे निकालान्वये जाब देणार क्रमांक 2 (राज्य शासन) यांनी जाब देणार क्रमांक 4 (पि.चि.मनपा) यांचे अर्जावर 28 डिसेंबर 2018 (दि.20/12/2018) चे ठरावावर निर्णय घेईल व तो निर्णय 4 आठवडयाच्या आत जाब देणारे क्रमांक 4 यांना कळवावा असे निर्देश दिले .

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग ,यांचे कडील शासन निर्णय क्रमांक पीसीसी-3018/प्र.क्र.525/नवि-22 दिनांक 05 जानेवारी 2022 अन्वये वाचले क्रमांक 1 चा ठराव विखंडीत करणेबाबतचे पत्र या कार्यालयास दिनांक 10/01/2022 रोजी प्राप्त झालेले आहे.

मा.उच्च न्यायालय यांचे दिनांक 22/03/2021 रोजीचे निकाल व नगरविकास विभागाकडील दिनांक 05/01/2022 रोजीचे पत्रानुसार पती-पत्नी एकत्रीकरण , एकतर्फीबदलीबाबत खालील प्रमाणे धोरण ठरविण्यात आलेले आहे.

1) वाचले क्रमांक 4 व 5 चे शासन निर्णयानुसार एकाच जिल्हातील नागरी किंवा ग्रामीण स्थानीक संस्थेमध्ये सेवावर्ग करता येणार नाही त्यानुसार अपात्र प्रस्ताव /अर्जदारास तसे कळविणेत यावे .
2) पती –पत्नी पैकी एक पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत कार्यरत असलेस जिल्हाबाह्य महानगरपालिका/नगरपालिका/नगरपंचायती कडील प्राथमिक शिक्षकांचे वाचले क्रमांक 5 निर्णयातील अटी शर्तीनुसार मनपात सेवा वर्गीकरणाचा प्रस्ताव सादर करावा.
3) विधवा/घटस्फोटित जिल्हाबाह्य महानगरपालिका/ नगरपालिका/नगरपंचायती कडील प्राथमिक शिक्षकांचे कुंटुंबातील व्यक्ती (जसे की,आई/वडील /भाऊ/बहिण/मुलगा/मुलगी) पिंपरी चिंचवड महानगरपालिका शहरात कायम स्वरुपी वास्तव्यास असणे बंधनकारक राहील. त्यांचे मनपा मध्ये वाचले क्रमांक 5 निर्णयातील अटी शर्तीनुसार मनपात सेवा वर्गीकरणाचे प्रस्ताव सादर करणे बंधनकारक राहील.
4) केंद्रशासन पुरस्कार / राज्य शासन पुरस्कार प्राप्त झालेले / गौरवलेले जिल्हाबाह्य महानगरपालिका/ नगरपालिका / नगरपंचायती कडील प्राथमिक शिक्षकांचे वाचले क्रमांक 5 निर्णयातील अटी शर्तीनुसार मनपात सेवा वर्गीकरणाचा प्रस्ताव सादर करावा.
5) मनपाचे प्राथमिक शिक्षण विभागात दिव्यांगांची जागा रिक्त असलेस जिल्हाबाह्य महानगरपालिका/नगरपालिका/नगरपंचायती कडील दिव्यांग प्राथमिक शिक्षकांची गुणवत्ता ( मुद्दा क्रमांक 4 नुसार ) बंधनकारक राहील . वाचले क्रमांक 5 निर्णयातील अटी शर्तीनुसार मनपात वर्गीकरणाचा प्रस्ताव सादर करावा.
6) मनपाकडे जिल्हाबाह्य महानगरपालिका/नगरपालिका/नगरपंचायती कडील एका पेक्षा जास्त अर्ज /प्रस्ताव प्राप्त असल्यास ज्याचा प्रथम नियमानुसार अर्ज/ प्रस्ताव प्राप्त होईल, त्याचा प्राधान्याने मनपा कडील रिक्त जागेनुसार विचार करावा.

7) शासनाकडील संचमान्यता व मा.मागासवर्ग कक्ष पुणे यांचेकडील प्रमाणित बिंदूनामवली नुसार रिक्त जागेवर पती-पत्नी एकत्रीकरण/एकतर्फी बदली बाबत वेळोवेळी पारित होणारे शासन निर्णयास अधिन राहून कार्यवाही करावी.

8) सेवा वर्ग करण्याच्या दिनांकाला शिक्षकांच्या भविष्य निर्वाह निधि खात्यात जमा असलेली रक्कम,निवृत्ती वेतन (अंशदान व सेवाउपदान) व रजावेतन वर्गणीचे धनादेश/डी.डी./रोख रक्कम पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत जमा केले नंतर संबंधित शिक्षक कर्मचारी यांना प्राथमिक शिक्षण, पिंपरी चिंचवड महानरपालिकेचे आस्थापनेवर रुजू करुन घ्यावे.

9) वाचले क्रमांक 4 चे शासन निर्णयातील 8 नुसार विनंतीवरुन कायमस्वरुपी समावेश हा संबंधित कर्मचाऱ्यांचा हक्क राहणार नाही. प्रशासनाचे व सार्वजनिक सेवेचे हित विचारात घेवून समावेशना व्दारे संबंधित कर्मचाऱ्यांस घ्यावे किंवा कसे यांचा निर्णय घेण्याचा पूर्ण अधिकार नियुक्ती प्राधिकऱ्यांना राहील.

17/03/22

(राजेश पाटील)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी पुणे-411018